तात्काळ

महाराष्ट्र शासन
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक ,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय , मुंबई- ४०० ०३२
Email ID: napu27.mhpds@gov.in

---

क्रमांक :रॉकेल-२०२०/प्र.क्र.८२/नापु २७ दिनांक: १८ ऑगस्ट, २०२१

प्रति,

१) नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
२) सर्व जिल्हाधिकारी
३) सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी.

विषय:- बायोडिझेल/बनावट डिझेलच्या अवैध विक्रेत्यांविरूध्द कारवाई करणेबाबत.
संदर्भ :-शासन निर्णय अ.ना.पु. व ग्रा.सं.वि, क्र: डिझेल-२०२०/प्र.क्र.८२/नापु-२७, दि. ११ मे, २०२१.

राज्य शासनाकडून बायोडिझेल उत्पादन, साठवणूक, पुरवठा व विक्री बाबत संदर्भाधिन दि. ११ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे. बायोडिझेलचे अवैधरीत्या उत्पादन, साठवणूक, पुरवठा व विक्री करणा-यांविरूध्द कारवाई करण्याबातच्या सूचना सदर शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. तथापि, राज्यात अनेक ठिकाणी बायोडिझेलची/बनावट डिझेलची अवैधरित्या विक्री होत असल्याचे व त्यातून करचुकवेगिरी होत असल्याचे राज्यस्तरीय समन्वयक, तेल उद्योग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. सचिव (अनापुवग्रासंवि) यांच्या अध्यक्षतेखाली दि. १० ऑगस्ट, २०२१ रोजी झालेल्या बैठकीदरम्यान नमूद केले आहे. त्याअनुषंगाने राज्यात अवैध बायोडिझेल/बनावट डिझेलच्या विक्रीस प्रतिबंध बसावा याकरीता तपासणी मोहिम राबविण्याबाबतचे निदेश मा. सचिव (अनापुवग्रासंवि) यांनी दिले आहेत. त्याअनुषंगाने आपल्या जिल्ह्यात अवैध बायोडिझेल/बनावट डिझेल विक्रेत्यांविरूध्द खालील सूचनांनुसार तपासणी मोहिम राबविण्यात यावी.

१. केंद्र शासनाने दि. ३० एप्रिल, २०१९ च्या अधिसूचनेन्वये बायोडिझेल पंपांच्या तपासणीचे अधिकार राज्य शासनाच्या अधिका-यांसह तेलकंपन्यांच्या भेसळविरोधी पथकासही दिले असल्याने शासकीय कर्मचा-यांची यंत्रणा व तेलकंपन्यांचे भेसळविरोधी पथक यांच्या संयुक्त पथकाव्दारे तपासणी मोहिम राबविण्यात यावी.
२. तेल कंपन्यांच्या स्थानिक अधिका-यांशी संपर्क करून तपासणी पथक तयार करावे. सदर तपासणी मोहिमेचे समन्वय संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी/अन्नधान्य वितरण अधिकारी यांनी करावे.

३. तपासणी दरम्यान बायोडिझेल विक्रेत्यांकडून महाराष्ट्र जमीन महसूल संहिता/बिगरशेती परवानगी असल्याची खात्री करावी तसच बिगरशेती वापराबाबतच्या तरतुदींचे उल्लंघन झाले असल्यास त्यानुसार विक्रेत्यांविरूध्द कारवाई करावी अथवा तेल कंपन्यांकडून अवैध पेट्रोल/डिझेल विक्रेत्यांविरूध्द MDG (Marketing Discipline Guidelines) नुसार ज्या धर्तीवर कारवाई करण्यात येते, त्या धर्तीवर अवैध बायोडिझेल विक्रेत्यांविरूध्द कारवाई करण्यात यावी.

४. सदर तपासणी मोहीम दि. ३१ ऑगस्ट, २०२१ पर्यंत राबवून अवैध बायोडिझेल/बनावट डिझेल विक्रेत्यांविरूध्द कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा. बायोडिझेलची अथवा बनावट डिझेलची अवैध विक्री होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

18/8/21

( सुधीर तुंगार )
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१. राज्यस्तरीय समन्वयक, तेलउद्योग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे दिलेल्या सूचनांनुसार संयुक्त पथकाद्वारे तपासणी मोहिम राबविण्याकरीता सर्व जिल्ह्यांमध्ये तेलकंपन्यांकडून अधिकारी/कर्मचारी उपलब्ध करून देण्याबाबतच्या सूचना सर्व तेल कंपन्यांना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात.

२. सर्व उपआयुक्त (पुरवठा) यांना उचित कार्यवाहिस्तव.